ISSN 2582-5429 (online)

# AKSHARA

## Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal
October - December 2020 Vol.02 ISSUE. III




Chief Editor : **Dr. Girish S. Koli** , AMRJ, Yawal
For Details Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

E-ISSN 2582-5429 (http://aimrj.com/index.php/Welcome/index)

**Akshara Multidisciplinary Research Journal**

Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal

**SJIF Impact - 5.675**

DOI Number - 04.2021-43234255

Home (http://aimrj.com/index.php/Welcome/index)
About AMRJ (http://aimrj.com/index.php/Welcome/about)
Board (http://aimrj.com/index.php/Welcome/eboard)
Peer-Reviews Policy (http://aimrj.com/index.php/Welcome/prpolicy)
All Previews Issue
Current Issue (http://aimrj.com/index.php/Welcome/currissue)
Special Issue (http://aimrj.com/index.php/Welcome/specialissue)
Guidelines for Author (http://aimrj.com/index.php/Welcome/gauthor)
Contact (http://aimrj.com/index.php/Welcome/contact)

**BOARD**

## Editor-In-Chief

img

**DR. GIRISH SHALIK KOLI (AMRJ)**

Address : Dongar Kathora, Tal. Yawal, Dist. Jalgaon [M. S.] India. Pin Code: 425301

Mobile : 09421682612

Email Id : aimrj18@gmail.com

Website : www.aimrj.com

## Member Of Editorial Board

ISSN 2582-5429(online)

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Octember-December 2020 VOL.02. ISSUE III

www.aimrj.com

Email ID. aimrj18@gmail.com

# Index



| Sr.No | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | भारतीय आर्य भाषाओं के संख्यावाचक शब्दों के विकास से संबंधित कुछ समस्याओं पर | डॉ सिराजूद्दीन नुर्मातोव | 4-9 |
| 2 | चीन में हिंदी विकास | विवेक मणि त्रिपाठी | 10-12 |
| 3 | प्रेमचंद की चयनित कहानियों में दलित | डॉ इबरार खान | 13-18 |
| 4 | समकालीन महिला लेखन और नारी चेतना | डॉ. संगीता सूर्यकांत चित्रकोटी | 19-24 |
| 5 | A Comparative Study of Stress among Male and Female Students with Visual Impairment | Asha P Pathrose<br>S Ramaa | 25-33 |
| 6 | Online Methods of Teaching in Indian Higher Education: Its Effective Practice | Dr. Ravi C. S | 34-38 |
| 7 | संशोधन पेपर : लेखन शैली | डॉ. विशाखा संजय कांबळे | 39-42 |
| 8 | दलित कवयित्रींच्या कवितेतील आत्मभान | डॉ. प्रेमा लेकुरवाळे | 43-51 |
| 9 | महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारांचे महिला सक्षमीकरणातील योगदान | प्रा.डॉ. विठ्ठल जीवतोडे | 52-58 |
| 10 | اردو شاعری میں حب الوطنی کے عناصر | ڈاکٹر آفاق انجم شیخ | 59-61 |
| 11 | History Repeats Itself: Analytical Study of Karnad's Tughlaq | Dr. Amol Ukhardu Bavaskar | 62-65 |
| 12 | Immigration- A Cultural Challenge in Dollar Bahu | Dr. P. A. Waghmare | 66-69 |
| 13 | क्रांतिकारी दलित साहित्यक अण्णाभाऊ साठे | डॉ. डब्ल्यू. मायादेवी | 70-72 |
| 14 | લોકશાહી અને પત્રકારત્વ | ડો. મણીબેન સોલંકી | 73-75 |
| 15 | ग्रंथ आणि त्याचे विविध विभाग: संक्षिप्त अभ्यास | डॉ. दिलीप गोविंदा पाटील | 76-81 |



©Copyright 2020 *AMRJ*. All Rights Reserved 

ISSN 2582-5429(online)

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Octember-December 2020 VOL.02. ISSUE III

www.aimrj.com
Email ID. aimrj18@gmail.com

# ग्रंथ आणि त्याचे विविध विभाग: संक्षिप्त अभ्यास

डॉ. दिलीप गोविंदा पाटील
ग्रंथपाल
को.ए.सो. लक्ष्मि-शालिनी महिला महाविद्यालय, पेझारीता-अलिबाग, जिल्हा-रायगड

**सारांश :**
ग्रंथाचे जग व ग्रंथाची निर्मिती ही मानवी इतिहासातील महत्वाची निर्मिती आहे. मानव निर्मित इतर कोणत्याही गोष्टी चिरंतन किंवा शाश्वत नसु शकतात. त्या अजरामर राहतील याची शाश्वती देता येत नाही. कारण संस्मरणीय वस्तू म्हणजेच स्मारके हे काही काळानंतर नष्ट होवू शकतात. कालबाह्य गोष्टी नष्ट होवू शकतात. अंध:काराचे युग काही काळासाठी सुरु होते पन त्यानंतर नव्या जाती, नव्या संस्कृती उदयास येतात. आणि त्याही काही काळानंतर नष्ट होवू शकतात. ज्ञान जगतातील ग्रंथ मात्र या साऱ्या गोष्टीचे साक्षीदार बनून चिरंतन होतात. चिरकाल टिकून राहतात. ज्या दिवशी ते विचार लिहिले गेले असतात. त्या दिवसासारखे ताजे, टवटवीत राहतात. काही शतकापुर्वीच मृत झालेल्या व्यक्तीचे हृदयातील विचार आजच्या जीवित व्यक्तीच्या हृदयापर्यंत ग्रंथाच्या माध्यमातून पोहोचवीत असतात. असे हे ग्रंथ मानवी जीवनाला उजाळा देत असतात. ग्रंथ निर्मिती ही मानवजातीची अखंड सोबतीण आहे त्यात मानवी जीवनाचा इतिहास आहे. ती वापरल्याने नष्ट होत नाही, तीचा क्षय होत नाही तर स्वत: अक्षय राहून कितीतरी पिढ्यांना ती ज्ञान देत असते. प्रस्तुत लेखात ग्रंथ व त्याचे विविध भाग याविषयी माहिती स्पष्ट केलेली असून ग्रंथालय व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रस्तावना:**
मानवाच्या भावभावना, कल्पना, विचार, अनुभव व ज्ञान अक्षरबद्ध करून ज्यात ग्रथित केलेले असते, त्याला स्थूल मानाने ग्रंथ असे संबोधिले जाते. आधुनिक कल्पनेनुसार ग्रंथ म्हणजे कागदावर लिहिलेल्या किंवा मुद्रित केलेल्या अनेक सुट्या वा बांधलेल्या पृष्ठांचा संग्रह होय. हलक्या पण टिकाऊ वस्तूवर लिहिलेला, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुलभतेने नेता येण्याजोगा व ज्यातील लेखन समाजासाठी वाचकांसाठी असते, अशा सुसंगत अर्थाच्या वाक्यांचा 'रचनाविशिष्ट समुदाय' अशी ग्रंथाची व्याख्या केली जाते. जुन्या संस्कृत भाषेत आणि जुन्या मराठीत बत्तीस वर्ण असलेला अनुष्टुभ् छंदातील श्लोक, समग्र वर्णसमूह, गद्यातील अथवा पद्यातील पोथी, पुस्तक, शास्त्र या अर्थींही ग्रंथ ह्या शब्दाचा वापर झालेला दिसतो. संस्कृत भाषेत ग्रंथाला 'पुस्त' असे पर्यायी नाव आहे. त्याचा अर्थ 'घडण' किंवा आकार देणे असा आहे. भाजलेल्या विटा, शिला व धातूंचे तुकडे यांवरील लेखन लक्षात घेता 'पुस्तक' या शब्दाची व्युत्पत्ती ध्यानात येते. मानवी संस्कृतीच्या ज्या अवस्थेत आपले विचार स्वत:साठी व भावी पिढीसाठी जतन करून ठेवावेत ही कल्पना माणसाच्या मनात रुजली, त्या मानवी संस्कृतीच्या अतिप्राचीन अवस्थेपासून कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात ग्रंथाचे अस्तित्व आढळते. ग्रंथालय व्यवस्थापनेच्या दृष्टीकोनातून ग्रंथाबद्दल सविस्तर माहिती प्राप्त करून घ्यायची असेल ग्रंथ आणि त्याचे विविध भाग व अंतरंगाबद्दल माहिती प्राप्त असणे आवश्यक आहे. ग्रंथालय कोणत्याही प्रकारचे असो त्यात वर्गीकरण व तालीकीकरण या प्रक्रियेला महत्वाचे स्थान आहे. तालीकीकारास तालिका तयार करण्यासाठी ग्रंथाबद्दल सविस्तर माहिती ग्रंथात शोधावी लागते. कारण त्याला वाचकांच्या मागणीनुसार विविध प्रकारच्या नोंदी तयार कराव्या लागतात. तालीकीकरणाचे कार्य सुलभ व बिनचूक करण्यासाठी ही माहिती आवश्यक असते. यासाठी ग्रंथ व त्याचे विविध भाग याबद्दलची माहिती असणे सर्वांसाठी म्हणजेच लेखक व वाचक आणि ग्रंथालय सेवकांसाठी फायद्याचे आहे.

**प्रस्तुत संशोधन लेखाची पद्धती :**प्रस्तुत संशोधन लेख तयार करण्यासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला असून माहिती संकलनासाठी माहितीच्या प्राथमिक साधनाचा अवलंब केलेला आहे.

**प्रस्तुत संशोधन लेखाची उद्दिष्टे :**

©Copyright 2020 *AMRJ*. All Rights Reserved

ISSN 2582-5429(online)

AMRJ

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Octember-December 2020 VOL.02. ISSUE III

www.aimrj.com

Email ID. aimrj18@gmail.com

१. ग्रंथनिर्मिती बाबत व त्याच्या प्रकाराबाबत माहिती जाणून घेणे.

२. ग्रंथ व त्यातील विभागाचा ग्रंथालय व्यवस्थापनेच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

**ग्रंथाची व्याख्या:**आधुनिक कल्पनेनुसार ग्रंथ म्हणजे कागदावर लिहिलेल्या किंवा मुद्रित केलेल्या अनेक सुट्या वा बांधलेल्या पृष्ठांचा संग्रह होय हलक्या पण टिकाऊ वस्तूवर लिहिलेला, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुलभतेने नेता येण्याजोगा व ज्यातील लेखन समाजासाठी असते, अशा सुसंगत अर्थाच्या वाक्यांचा 'रचनाविशिष्ट समुदाय' अशी ग्रंथाची व्याख्या केली आहे. अनेक पृष्ठांचे हस्तलिखीत अथवा छापील सामग्री ज्यांना एकत्र बांधून ग्रंथाचा आकार दिला गेला असेल तो ग्रंथ होय. अशी सर्वसाधारण ग्रंथाची व्याख्या करता येईल.

इ.स. १९६४ मध्ये युनेस्को येथे झलेल्या संमेलनात ग्रंथाची व्याख्या पुढीलप्रमाणे करण्यात आली.

'मुखपृष्ठ अथवा वेष्टनांना सोडून कमीत कमी ४९ पृष्ठांची छापील सामग्री पत्रपत्रिकांपेक्षा वेगळी असेल तो ग्रंथ होय.'

**ग्रंथाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:** - ग्रंथपूर्व काळातही विचार संक्रमणाचे कार्य अनेक शतके 'श्रुतिस्मृति' द्वारा व्यक्तिगत रीत्या घडत असे. भारतात ज्ञानाची व्याख्याच मुळी 'श्रुतिस्मृति' अशी होती. गुरुमुख हे त्या काळात ज्ञानप्रसाराचे एकमेव साधन होते. प्राचीन ऋषीमुनी आपले ज्ञान व अनुभव स्वमुखाने आपल्या शिष्यांना कथन करीत असत. संस्कृतातील वेदवाङ्मय हे शेकडो वर्षे याच पद्धतीने जतन केले गेले. प्रत्यक्ष लिपिसंशोधनानंतर मानवाने ग्रंथलेखनास नेमकी सुरुवात केंव्हा केली, हे त्या काळातील अनेक प्रकारचे लेखनसाहित्य काळाच्या ओघात नष्ट झालेले असल्यामुळे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. आज उपलब्ध असलेल्या ग्रंथांत इ.स.पू.सु. ३००० वर्षांपूर्वीचे मेसोपोटेमिया येथील इष्टिकाग्रंथ व ईजिप्तमधील पपायरसच्या गुंडाळ्या हे जगातील सर्वांत प्राचीन ग्रंथ गणले जातात. आपले विचार ग्रथित करावयास मानवाला जी जी साधने उपलब्ध झाली व सोयीची वाटली, ती ती वापरून त्याने लेखनास प्रारंभ केला. साधनांच्या प्रकारानुसार ग्रंथाच्या बाह्यस्वरूपात बदल झालेला आढळतो. ही साधने म्हणजे पाषाण, मातीच्या विटा किंवा इष्टिका, बांबूच्या चिरफळ्या, झाडांच्या साली (ताडपत्रे), पाने (भूर्जपत्रे), पपायरसाचे पापुद्रे, धातूंचे पत्रे व कमावलेले कातडे इ. होत वरील साधनांत उत्क्रांती  होत होत अखेरीस ग्रंथासाठी कागदाचा वापर होऊ लागला. या विविध वस्तूंवर लिहिण्यासाठी वेगवेगळी साधने असत. छिन्नी, दाभण, पक्ष्यांची पिसे, बोरू, टाक ही लेखनाची साधने होती. काजळ वा अन्य पदार्थांपासून तयार केलेली शाई लेखनासाठी वापरली जाई. लेखनकला व लिपी यांचा  जसजसा विकास होत गेला, तसतसा ग्रंथाच्या स्वरूपात बदल घडत गेला. तसेच ज्ञान, विज्ञान व एकूण वाङ्मयाची जसजशी अभिवृद्धी होत गेली, तसतशी ग्रंथसंख्येतही भर पडत गेली. ग्रंथांचा इतिहास हा एकप्रकारे मानवी संस्कृतीच्या विकासाचा इतिहास होय. कोणत्याही राष्ट्राच्या वैभवात ग्रंथनिर्मितीला फार मानाचे स्थान आहे. अगदी आरंभीचे लेखन हे धार्मिक आदेश, मंत्र, तंत्र, राजाज्ञा व न्यायनिवाडे या स्वरूपाचे होते. त्यात ग्रंथांची निर्मिती व वाढ झाली ती धर्माच्याच अनुषंगाने. राजा हा परमेश्वराचा अंश मानला गेल्यामुळे राजाज्ञेला धर्माचे पावित्र्य लाभले. त्यामुळे देवालये, मठ इ. धार्मिक स्थानांबरोबर राजप्रासादातही ग्रंथसंग्रह वाढीस लागले. त्याचबरोबर काही पर्यटकांनी लोकांचे ग्रंथसंग्रह नष्ट करावयाचे किंवा पळवून न्यावयाचे अशा घटनाही इतिहासकाळात घडलेल्या आहेत. ऋग्वेदातील लेखनकलेच्या उल्लेखावरून त्या काळात लेखनकला ज्ञात होती, असे अनुमान करता येईल. परंतु वेदवाङ्मय अनेक शतके मुखनिविष्ट होते. वेदानंतर उपनिषदे, ब्राह्मणे, आरण्यके इ. वेदांगे यज्ञप्रसंगी जमलेल्या विद्वान श्रोतृसमुदायापुढे म्हणून दाखवीत व त्यांवर चर्चा होई. वेदवाङ्मय निर्माण होऊनही ते ग्रंथबद्ध केव्हा झाले, याविषयी निश्चित अनुमान करणे कठीण आहे. मोहें-जो-दडो व हडप्पा येथील उत्खननांत सिंधू संस्कृतीचे जे अवशेष आढळले, त्यांत त्या काळचे कोरीव लेख उपलब्ध झाले आहेत. इ.स.पू.सु. ६०० मध्ये लिहिलेल्या पाणिनीच्या अष्टाध्यायीत 'लिपी', 'लिपिकार' असे स्पष्ट उल्लेख केलेले आहेत. अलेक्झांडरच्या स्वारीत नीआर्कस नावाचा गृहस्थ भारतात आला होता. भारतात लेखनासाठी त्या काळी कागद वापरला जात होता, असा त्याने उल्लेख केला आहे. या उल्लेखावरून भारतात इ.स.पू. चौथ्या शतकात काही प्रमाणात कागद वापरला जात असावा, असे दिसते. परंतु हा कागद यूरोपातून न येता चीनमधून आलेला असावा. त्या काळातील ग्रंथ मात्र आज उपलब्ध नाहीत. कालिदासाच्या ग्रंथात उल्लेख केलेली ताळपत्रे व भूर्जपत्रे हीच भारतातील खरी प्राचीन ग्रंथसाधने होत.

©Copyright 2020 *AMRJ*. All Rights Reserved 

ISSN 2582-5429(online)

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Octember-December 2020 VOL.02. ISSUE III

www.aimrj.com
Email ID. aimrj18@gmail.com

क्षेमेंद्राने आपल्या लोकप्रकाश ग्रंथात झाडांची पाने कापण्याच्या कात्र्या, लेखण्या व शाईच्या दौती यांचा उल्लेख केला आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात लेखनासाठी कोणती साधने वापराली याचा उल्लेख आहेत. ताळपत्रे व भूर्जपत्रे एका बाजूला भोक पाडून बांधलेली, ओवलेली असत व त्यांवर पुठ्ठ्याच्या अथवा धातूच्या रंगीत पट्ट्या बांधत.

बौद्धकाळात भारतातील ग्रंथलेखनास बहर आला. नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला इ. विद्यापीठांतून भूर्जपत्रांवरील व ताळपत्रांवरील लक्षावधी ग्रंथ संग्रहित करण्यात आले होते. चिनी पंडीत फाहियान याने ४०० मध्ये, इत्सिंग याने ६७१ मध्ये धार्मिक ग्रंथांच्या नकला करून नेल्याचा उल्लेख आहे. मुसलमानी आक्रमकांनी ज्यावेळी या विद्यापीठांचा विध्वंस केला, त्यावेळी हजारो पोथ्या घेऊन बौद्ध भिक्षू नेपाळात पळून गेले. हे प्राचीन ग्रंथ आजही तेथे पहावयास मिळतात. जैन राजांनीही ग्रंथनिर्मितीस उत्तेजन दिले. पंडित हेमचंद्र व राजा कुमारपाल यांच्या प्रोत्साहनाने गुजरातेत ताडपत्रावर हजारो ग्रंथ लिहिले गेले व जैन मंदिरे आणि राजवाडे यांमधून त्यांचा संग्रह करण्यात येऊ लागला. या काळात नकलनविसांना भरपूर मानधन मिळत असून विद्वान पंडितांचा तो एक प्रतिष्ठित व्यवसाय होता. भगवद्‌गीता, रामायण, महाभारत यांसारख्या मोठ्या ग्रंथांच्या नकला करण्यास वर्षानुवर्षे लागत. या ग्रंथांत चित्रे व आकृत्या ते सजविले जात. भारत व इराण या देशांत ग्रंथचित्रणाची कला भरभराटीस आली होती. बिकानेर,जोधपूर येथील ग्रंथालयांत आज जे हस्तलिखित ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यांतील, विशेषतः जैन ग्रंथांत, अनेक जैन आचार्यांच्या जीवनातील प्रसंगांची सुंदर चित्रे आढळतात. रामायण-महाभारताच्या हस्तलिखितांतही आरंभी सुंदर चित्रे व नक्षीकाम केलेले आढळते. एकनाथांचे समकालीन असणारे आंबेजोगाईचे संतकवी दासोपंत ह्यांनी पंचीकरण हा ग्रंथ पासोडीवर लिहिलेला आहे. त्यात जागोजागी चित्रेही आहेत. भारतातील ग्रंथांचा आणखी एक विशेष म्हणजे त्याचे करण्यात आलेले विषयानुसारी विभाग. या विभागांना वेगवेगळी नावे दिलेली आहेत. ऋग्वेदातील अष्टके व मंडले, भागवतातील स्कंध, रामायणाची कांडे, याप्रमाणे लहरी, उच्छ्‌वास, पाद, पर्व, स्तबक अशी विभाग नावे संस्कृत ग्रंथांत दिलेली आढळतात. यांपैकी काही नावे लेखन साहित्यावरून दिलेली आहेत, हे उघड आहे. भारतात १५५६ मध्ये मुद्रणकलेचा प्रारंभ झाला. गोव्यात ६ सप्टेंबर १५५६ रोजी जुआँ द दुस्तामांती हा गृहस्थ पोर्तुगालहून छापखाना घेऊन आला आणि त्याने १५५७ मध्ये दौत्रीन ख्रिस्तां हे पुस्तक छापले. फादर स्टिफन्स याने १६१६ मध्ये रोमन लिपीतील मराठी भाषेत क्रिस्तपुराण छापले. यानंतरच्या काळात मुद्रणाचे आणखी काही प्रयत्न झाले. १८०५ मध्ये श्रीरामपूर येथे छापलेले कॅरीचे मराठी भाषेचे व्याकरण हा मराठी ग्रंथमुद्रणातील महत्त्वाचा टप्पा होय. १८०५ पूर्वी मराठीत छापलेल्या ग्रंथांना 'आद्यमुद्रिते' मानावे, असा संकेत मान्य झाला आहे. त्यांची यादी शं. ग. दाते यांच्या मराठी ग्रंथसूचीत दिलेली आहे.

**ग्रंथांचे प्रकार:**

**शिळाग्रंथ:-** अशोकाचे शिलालेख व बाराव्या शतकातील हरिकेली आणि ललितविग्रहराज या संस्कृत नाटकांचे शिलांवर केलेले खोदकाम यांना ग्रंथ म्हणावे की काय, याबद्दल दुमत असण्याची शक्यता आहे; परंतु शिळाग्रंथांचा प्राचीन नमुना म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल.

**इष्टिकाग्रंथ:-** पाश्चात्त्य संशोधकांनी एकोणिसाव्या शतकात आशियामायनरमध्ये जे उत्खनन केले, त्यात त्यांना इ.स.पू. सातव्या शतकातील ॲसिरियन राजा असुरबनिपाल याच्या ग्रंथालयांतील विटांवरील ग्रंथ उपलब्ध झाले. याच प्रकारचे ग्रंथ ॲलेक्झांड्रियाच्या टॉलेमी राजाच्या ग्रंथालयांत व जिनीव्हा येथेही उपलब्ध झाले. पाच इंच लांबीच्या, अर्धवट ओल्या असलेल्या विटांवर दाभणासारख्या कोरणीने कोरून लिहिले जाई व ह्या विटा भट्टीत किंवा उन्हात वाळवून कठीण केल्या जात. एका विटेवरच्या सहाही पृष्ठभागांवर लेखन पूर्ण झाले नाही, तर ग्रंथासाठी अनेक विटा वापरल्या जात व विटांवर पृष्ठांक घातले जात. जगातील प्राचीनतम ग्रंथांत या इष्टिकाग्रंथांची गणना केली जाते.

**बांबूच्या चिरफळ्यांवरील ग्रंथ:-** इ.स.पू.१३०० मध्ये लाकूड अथवा बांबूच्या चिरफळ्या करून त्यांवर लिहिलेले ग्रंथ चीनमध्ये होते, असे मानले जाते. शिर व्हांग ती याने इ.स.पू. २१३ मध्ये अशा अनेक ग्रंथांचा नाश केला. त्यातून वाचलेल्या ग्रंथांची वैद्यक, तत्त्वज्ञान, काव्य, ज्योतिष या विषयवारीने तयार केलेली एक यादी उपलब्ध आहे. दमट हवेमुळे हेही ग्रंथ नष्ट पावले असावेत.

ISSN 2582-5429(online)

Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Octember-December 2020 VOL.02. ISSUE III

www.aimrj.com
Email ID. aimrj18@gmail.com

**पपायरसावरील ग्रंथ:--** ईजिप्तमधील नाईलच्या परिसरात पपायरस नावाची लव्हाळ्याच्या जातीची वनस्पती विपुल प्रमाणात उपलब्ध होत असे. तिच्या खोडाचे १३—१५ सेंमी. रुंदीचे पातळ तुकडे एकास एक जोडून पापुद्रे तयार करण्यात येते व त्यांवर हायरोग्लिफिक चित्रलिपीत एका बाजूने लिहिण्यात येई. या ग्रंथांच्या गुंडाळ्या मातीच्या रांजणात ठेवीत. इ.स.पू. २५०० या काळातील पपायरसावरील अनेक ग्रंथ ईजिप्तमधील पिरॅमिडमध्ये सुरक्षित स्थितीत उपलब्ध झाले आहेत. कारण हे ग्रंथ एक तर अनेक शतके जमिनीखाली रांजणांत होते व या प्रदेशात पाऊस अजिबात नसल्यामुळे या रांजणांत पाणी शिरले नाही व त्यामुळे ते सुरक्षित राहिले. दुसरे कारण म्हणजे हे ग्रंथ शवपेटीत ठेवलेले होते. पपायरसावर धर्माज्ञा, मंत्र, तंत्र इ. लिहून ते परलोकी उपयोगी ठरावे या दृष्टीने राजघराण्यातील मृत व्यक्तीभोवती ते गुंडाळून ठेवीत व बंदिस्त शवपेटी पिरॅमिडच्या मधल्या दालनात ठेवण्यात येई. त्यामुळे हे ग्रंथ सु.पाच हजार वर्षे सुरक्षित राहिले. या ग्रंथांना मृतांचे ग्रंथ असे म्हणतात. ईजिप्तमध्ये अन्य ठिकाणी पपायरसावरील जे ग्रंथ उपलब्ध झाले, त्यांतून लोककथा व तत्कालीन शास्त्रीय ज्ञान यांची माहिती मिळते. ग्रीक कवी होमर, तत्त्वज्ञ प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या काळी पपायरसाचा उपयोग ग्रंथलेखनासाठी केला जाई. प्राचीन ग्रीक भाषेत ग्रंथ ह्या अर्थी 'बिबलिओ' हा शब्द प्रचलित होता व तो पपायरस या शब्दावरून आला आहे. यावरून पपायरसावरील ग्रंथांचे अस्तित्व सिद्ध होते. ग्रीसमध्ये विद्या व कला यांची वाढ झाल्यानंतर ॲलेक्झांड्रिया व पर्गामम ही दोन शहरे विद्येची माहेरघर म्हणून प्रसिद्ध पावली. या शहरांतील ग्रंथालयांत पपायरसावरील अनेक ग्रंथ अस्तित्वात होते

**चर्मग्रंथ:-** टिकाऊपणाच्या दृष्टीने जनावरांची कमावलेली कातडी लेखनासाठी वापरण्यात येऊ लागली. ईजिप्तमध्ये इ.स.पू. चोविसाव्या शतकातील कातड्यावरील लेखनाचा नमुना उपलब्ध झाला आहे. १९४७ मध्ये मृत समुद्राच्या परिसरात उत्खनन झाले, त्यात हिब्रू लोकांनी मातीच्या भांड्यांतून ठेवलेले कातड्यावरील ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. ॲलेक्झांड्रिया व पर्गामम या शहरांतील नागरिकांच्या विद्या व कला या क्षेत्रांतील स्पर्धेमुळे ॲलेक्झांड्रियाच्या पाचव्या टॉलेमीने पपायरसाची निर्यात बंद करून टाकली. त्यामुळे इसवी सनाच्या पहिल्याशतकात पर्गाममचा राजा दुसरा यूमीनीझ याने ग्रंथलेखनासाठी व्हेलम पार्चमेंट या जातीची कमावलेली कातडी वापरण्यास सुरुवात केली. मध्ययुगात अशा प्रकारच्या ग्रंथांचा फार मोठा प्रसार यूरोपमध्ये झाला. धर्मग्रंथांबरोबर इतर ग्रंथांसाठीही यानंतरच्या काळात कातड्याचा वापर होऊ लागला. बाराव्या शतकात जेथे जेथे विद्यापीठे स्थापन झाली, तेथे तेथे ग्रीक व लॅटिन भाषांतील ग्रंथांच्या नकला करण्यासाठीही कातड्याचा वापर करण्यात येई. चौदाव्या शतकात यूरोपात देशी भाषांचा उदय झाला. त्यांमधून स्वतंत्रपणे रचना तर झालीच, परंतु त्याचबरोबर दान्ते, पित्रार्क, चॉसर आदि लेखकांच्या ग्रंथांच्या नकला तयार करण्यात येऊ लागल्या. बायबलच्या तर अनेक नकला केवळ व्हेलमवरच केल्या गेल्याचे आढळते.

**कागदावरील ग्रंथ:-** इ. स. १०५ च्या सुमारास चीनमध्ये कागदाचा शोध लागला. सुती चिंध्यांचा लगदा तयार करून त्याचा थर चाळणीवर घालत व तो वाळवून कागद बनविण्यात येई. अरब व्यापाऱ्यांच्या मार्फत हा शोध यूरोप व भारतात पोहोचला. कागदाप्रमाणे मुद्रणकलाही चीनमध्ये पाश्चिमात्यांच्या कितीतरी आधी माहीत झालेली होती. १९०७ मध्ये बौद्ध ग्रंथ शोधण्यासाठी एक बंदिस्त गुहा उघडण्यात आली. त्या गुहेत तीन हजार सुरळ्यांचे मुद्रित ग्रंथ उपलब्ध झाले. त्यांपैकी हीरकसूत्र या ग्रंथावर ११ मे ८६८ हा मुद्रणकाल छापण्यात आला असून त्यावर 'वांग चिएह' याने तो छापला असाही उल्लेख आहे. जगातील सर्वांत जुना ज्ञात असा हा मुद्रित ग्रंथ असून ब्रिटिश म्यूझीयममध्ये तो आज उपलब्ध आहे. चीनमधील या कागदाच्या अथवा छपाईच्या शोधाचा परिणाम पंधराव्या शतकापर्यंत यूरोपात झालेला नव्हता. १४३९ मध्ये जर्मनीमधील माइन्त्स या गावी योहान गृटेनबेर्क याने खिळ्यांच्या छपाईचा शोध लावला व त्यामुळे मुद्रणकलेत क्रांतिकारक बदल घडून आला. हॉलंडमधील लॉरेन्स यान्सन कॉस्टर याने १४४१ मध्ये छापलेले (इं. शी. मिरर ऑफ अवर सॅल्व्हेशन) हे जगातील पहिले मुद्रित पुस्तक होय, असे काहींचे मत आहे. १४५६ ते १५०० या कालावधीत मुद्रणालयांचा यूरोपात झपाट्याने प्रसार झाला. जवळजवळ प्रत्येक प्रमुख शहरी मुद्रणालय निघाले व केवळ ४०—५० वर्षांत विविध ग्रंथांच्या सु. ४० हजार प्रती छापल्या गेल्या. ही संख्या तोपर्यंत उपलब्ध असलेल्या सर्व हस्तलिखित ग्रंथांच्या संख्येहून अधिक होती.

©Copyright 2020 *AMRJ*. All Rights Reserved

ISSN 2582-5429(online)

Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Octember-December 2020 VOL.02. ISSUE III

www.aimrj.com
Email ID. aimrj18@gmail.com

**आद्यमुद्रिते :-** मुद्रणकलेच्या प्रारंभकाळात म्हणजे पंधराव्या शतकात मुद्रित केलेल्या ग्रंथांना 'आद्यमुद्रिते' किंवा 'दोलामुद्रिते' म्हणतात. ही आद्यमुद्रिते हुबेहूब हस्तलिखितांसारखी होती. हस्तलिखितांत नसलेली प्रकाशक, मुद्रक इ. माहिती या आद्यमुद्रितांत दिलेली असे. प्रारंभीच्या काळात मुखपृष्ठ ग्रंथाच्या अखेरीस दिले जाई. परंतु कालांतराने आजच्या ग्रंथांप्रमाणे ग्रंथकर्ता, ग्रंथनाम, प्रकाशक, प्रकाशनवर्ष इ. माहिती असलेले मुखपृष्ठ ग्रंथाच्या सुरुवातीला देण्याची प्रथा सुरू झाली. या आद्यमुद्रितांतील बहुसंख्य ग्रंथ बायबल आणि त्यावरील टीका या स्वरूपाचे होते. त्यांपैकी फारच थोडे ग्रंथ आज उपलब्ध असल्यामुळे त्यांच्या खरेदी-विक्रीस फार मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

**सूक्ष्मपत्रे (मायक्रोकार्ड) व सूक्ष्मपट (मायक्रोफिल्म) :-** विसाव्या शतकात मुद्रणकला व छायाचित्रण यांमध्ये क्रांतिकारक प्रगती झाल्याने ज्ञान जतन करण्यासाठी सूक्ष्मपत्रे व सूक्ष्मपट ही साधने वापरात आली. ग्रंथातील अनेक पृष्ठे एका लहानशा सूक्ष्मपत्रावर अथवा सूक्ष्मपटावर छापण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे, अनेक पृष्ठांचा मोठा ग्रंथ अथवा अनेक वर्षांचे मासिकांचे खंड एका लहानशा खोक्यात मावतील, एवढ्या आकारात बाळगणे सुलभ झाले आहे. या सुधारणेमुळे ग्रंथसंरक्षण व ग्रंथप्रसार यांत आमूलाग्र बदल झाला असून ग्रंथालयांना भेडसावणारा जागेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला आहे. अर्थात सूक्ष्मपत्रे व सूक्ष्मपट यांवरील ग्रंथ तयार करण्यास व ते वाचण्यास लागणारी यंत्रसामग्री मिळविणे खर्चाचे असल्याने या साधनांचा वापर सार्वत्रिक झालेला नाही.

**वर्तमान संगणक युग :** सध्याच्या वर्तमान संगणक युगात ग्रंथाचे पुढील प्रकारात वर्गीकरण केले जाते.

१. **ग्रंथ:** - यामध्ये अनेक विषयाची ग्रंथ असतात. उदा. कला. वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, इ.
२. **संदर्भ ग्रंथ:** यामध्ये शब्धकोश, विश्वकोश, गजेटीअर, नकाशे,
३. **दुर्मिळ ग्रंथ:**साधारणत: जवळपास १०० ते २०० या वर्षातील ग्रंथ, जे सहजासहजी उपलब्ध होत नाही.
४. **अन्य ग्रंथ :**पीएच डी., अथवा एम.फिल. आणि अन्य संशोधन प्रोसिडिंग व अन्य साहित्याचा समावेश होतो.

**ग्रंथांचे बाह्यांग :** पपायरसावरील ग्रंथ एकाच बाजूस लिहिलेला, लांबरुंद व गुंडाळलेल्या स्वरूपात असे, परंतु कातड्यावर दोन्ही बाजूंनी लिहिता येई, शिवाय त्याचा आकार मोठा असे व त्याच्या घड्याही घालता येत. त्यामुळे ग्रंथाला लहान व सुटसुटीत आकार प्राप्त झाला. पुढे दुपत्री, चतुष्पत्रि व अष्टपत्री अशी पृष्ठे वापरून ग्रंथ लिहिला जाऊ लागला. डाव्या अथवा वरच्या बाजूने ही सर्व पृष्ठे एकत्रित चिकटवून व वर जाड पुठ्ठा चिकटवून आज आपण ज्या स्वरूपात ग्रंथ पाहतो, त्या प्रकारचा ग्रंथ तयार होऊ लागला. बायबल लिहिण्यासाठी वासराचे कातडे वापरल्यामुळे अशा ग्रंथाला 'कोडेक्स' म्हटले जाऊ लागले. पंधराव्या शतकातील असे अनेक ग्रंथ आज उपलब्ध आहेत. ईजिप्तच्या टॉलेमी राजांनी ग्रंथांच्या प्रती तयार करण्यासाठी अनेक नकलनवीस नेमले होते. परंतु त्यांच्याकडून एका वेळी एकच प्रत तयार होई. सिसेरोच्या काळात रोमन साम्राज्यात सरदारांच्या पदरी असलेल्या गुलामांकडून, एकाने सांगून इतरांनी लिहावयाचे या पद्धतीने, एकाच वेळी तीस-तीस प्रती तयार होत असत. त्यामुळे जे ग्रंथ पूर्वी केवळ राजांना व श्रीमंतांनाच घेणे शक्य होते, ते मध्यम वर्गीयांना विकत घेता येऊ लागले. मुद्रणकलेच्या शोधानंतर एकाच वेळी ग्रंथाच्या अनेक प्रती तयार करता येऊ लागल्या, किंमती कमी झाल्या, देशी भाषांतील ग्रंथांना उत्तेजन मिळाले व ते सर्वसामान्य माणसांना घेता येऊ लागले.

**ग्रंथाचे विविध भाग:**

१. मुखपृष्ठ, वेस्टन (Cover, Jacket)
२. ग्रंथ बांधणी वेस्टन (Binding Cover)
३. त्रोटक ग्रंथनाम पृष्ठ (Half Title Page)
४. दर्शनी चित्र (Frontis Piece)
५. ग्रंथनाम पृष्ठ (Title Page)
६. अर्पण पत्रिका (Dedicate Page)
७. लेखकाचे / संपादकाचे निवेदन (Authors / View)
८. आशीर्वाद प्रस्तावना (Forwarded & Introductory page)

©Copyright 2020 *AMRJ*. All Rights Reserved 

ISSN 2582-5429(online)

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Octember-December 2020 VOL.02. ISSUE III

www.aimrj.com

Email ID. aimrj18@gmail.com

९. अनुक्रमणिका (Contents)

११.ग्रंथ मजकूर :

१२.परिशिष्टे (Annexure)

११. निर्देश (Index)

१३. दुरुस्तीपत्रक (Erratta / Corrigendum)

१४. अभिप्राय पृष्ठ

१५. संदर्भ सूची (References)

१६. ग्रंथसूची (Bibliography)

**ग्रंथाच्या विविध अंतरंगाची माहिती पुढीलप्रमाणे आहे.**

**१.मुखपृष्ठ** :-तालीकीकरणाच्या दृष्टीने ग्रंथाच्या या प्रथम भागाच्या समोरच्या बाजूला ग्रंथनाम, ग्रंथकाराचे नाव, प्रकाशक, स्थळ, माला, किंमत, आवृत्ती, इत्यादी माहिती प्राप्त होवू शकते. परंतु सर्वच ग्रंथावर ही संपूर्ण माहिती मिळेलच असे नाही. मुख पृष्ठाच्या मागील बाजूस प्रकाशित झालेल्या पुस्तकाची यादी आणि भविष्यात प्रकाशित होणाऱ्या पुस्तकाची यादी दिलेली आढळते. मुखपृष्ठाच्या दर्शनी भागाच्या आतील बाजूस किंवा मुखपृष्ठाच्या मागील बाजूच्या आतील भागात ग्रंथकाराचा परिचय दिलेला आढळून येतो. ग्रंथाच्या या प्रथम भागाचा मुख्य उद्देश वाचकाचे लक्ष ग्रंथाकडे केंद्रित करण्याचा असतो.

**२. ग्रंथ बांधणी वेस्टन**:-प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक ग्रंथाला मुख पृष्ठ किंवा वेस्टन असतेच असे नाही. मात्र ग्रंथ बांधणी वेस्टन हे असते. हे वेस्टन संपूर्ण ग्रंथाचे संरक्षण करण्याचे कार्य करीत असते. कारण हे वेस्टन ग्रंथातील आतील पृष्ठांशी जोडलेले असते. ग्रंथाच्या या भागावर तालिकेत आवश्यक असणारी माहिती म्हणजेच ग्रंथशीर्षक, ग्रंथकार, प्रकाशक, प्रकाशन स्थळ, किंमत, आवृत्ती, ISBN क्रमांक इत्यादी माहिती दर्शनी भागावर प्राप्त होते.

**३.त्रोटक ग्रंथनामपृष्ठ**:- या पृष्ठावर ग्रंथ शीर्षक त्रोटक स्वरूपात दिलेले असते. त्याचप्रमाणे प्रकाशन मालेचे नाव, संपादक, माला क्रमांक दिलेला आढळतो. पान हा भाग सर्वच भागामध्ये सापडणार नाही.

**४. दर्शनी चित्र**:-ग्रंथाचा हा भाग साधारणत: ग्रंथनाम पृष्ठाच्या समोरच्या पृष्ठावर देण्यात येतो. बहुतेक गौरव ग्रंथ, चरित्र ग्रंथ, आत्मचरित्र या ग्रंथामध्ये दर्शनी चित्रे दिलेली असतात. यात विषयांशी संबंधित व्यक्तीची छायाचित्रे साध्या, रंगीत, आर्ट पेपरवर दिलेले आढळतात. ज्या व्यक्तीचे छायाचित्र असेल त्या व्यक्तीचे पूर्ण नाव, जन्म तारीख व मृत्यू तारीख दिलेली असते. कधी कधी छायाचित्राच्या जागेवर नकाशेसुद्धा देण्यात येतात.

**५.ग्रंथनाम पृष्ठ**:-ग्रंथाच्या मुख्य नोंदी करिता जी माहिती आवश्यक असते ती संपूर्ण माहिती ग्रंथाच्या या भागावर मिळत असते. जसे-ग्रंथनाम, उपग्रंथनाम, ग्रंथकाराचे नाव, आवृत्ती, खंड, प्रकाशकाचे नाव व पत्ता, किंमत, माला, टोपणनाव, सहायक (अनुवादक, संपादक, संकलक, संक्षेपक), प्रकाशन वर्ष इत्यादी. या भागावर प्राप्त होणारी माहिती तालीकीकरनाच्या दृष्टीने अधिकृत मानली जाते. तर प्रत्येक ग्रंथनाम पृष्ठामागे मुद्रक, प्रकाशक, प्रकाशन स्थळ, पूर्वीच्या आवृत्या, त्याची प्रकाशनवर्ष, किंमत, तयार वर्गांक, इतकेच नव्हे तर तयार मुख्य नोंदही दिलेली आढळते. त्यासोबतच ग्रंथप्राप्ती क्र. (ISBN No) दिलेला असतो. ही माहिती नोंदीच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी ठरत असते.

**६.अर्पण पत्रिका पृष्ठ** :-ग्रंथलेखन झाल्यानंतर ग्रंथलेखन करण्यास प्रवृत्त करणारी ग्रंथकाराची अत्यंत प्रिय व्यक्ती किंवा एखाद्याची स्मृती कायम राहावी म्हणून त्याला आदरांजली देण्याच्या किंवा समर्पित करण्याच्या उद्देशाने किंवा सन्मान करण्याच्या हेतूने ग्रंथकार लेखनकृती त्यांच्या नावाने अर्पण करीत असतो अथवा एखाद्या संस्थेला अर्पण करीत असतो. अश्या वेळेस अर्पण पत्रिका हा भाग ग्रंथात असतो.सर्वच ग्रंथात हा भाग असतोच असे नाही.

**७. लेखकाचे अथवा संपादकाचे मनोगत** :-ग्रंथाच्या या भागात ग्रंथालेखकाची किंवा संपादित ग्रंथ असेल तर संपादकाची ग्रंथलेखनाची भूमिका विषद केलेली असते. त्यात ग्रंथ लेखनाचा उद्देश, ग्रंथात प्रस्तुत केलेल्या विषयाचा वाचकाच्या दृष्टीने उपयोग, ग्रंथाची मांडणी अथवा रचना, ग्रंथ लेखनात ग्रंथकाराला आलेल्या अडचणी इत्यादी बाबीचा उल्लेख

ISSN 2582-5429(online)

Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Octember-December 2020 VOL.02. ISSUE III

www.aimrj.com
Email ID. aimrj18@gmail.com

असतो. या माहितीचा उपयोग तालीकीकरणाच्या दृष्टीने विषय निश्चित करण्यासाठी केला जातो.तसेच यामुळे ग्रंथातील विषयाची कल्पना आणि थोडक्यात माहिती प्राप्त करता येते.

**८. आशीर्वाद प्रस्तावना पृष्ठ** :-या भागात ग्रंथकाराशिवाय ग्रंथातील विषयाच्या विषय तज्ज्ञाने ग्रंथासंबधी व्यक्त केलेले मत दिलेले असते. त्यात ग्रंथलेखनाचा उद्देश, विषयाची व्याप्ती, विषय प्रस्तुती करण्याचा विशेष दृष्टीकोन, ग्रंथाचा उपयोग, ग्रंथाच्या मर्यादा-उणिवा, इ. ग्रंथ परिचयात्मक माहिती असते. या भागातील माहितीचा उपयोग ग्रंथाचा निश्चित विषय ठरविण्यासाठी होत असतो.

**९.अनुक्रमणिका** :-अनुक्रमणिका बहुतांश सर्वच ग्रंथात असते. ग्रंथाच्या या भागात प्रतिपादित केलेला विषय, उपविषय,प्रकरणे व त्यांचे पृष्ठ क्रमांक दिलेले असतात. त्यावरून ग्रंथाचा मुळ विषय निश्चित करता येतो. वरील अनुक्रमांक १ ते ९ या ग्रंथाच्या भागास प्रास्ताविक पृष्ठे असे म्हणतात. या भागानंतरच मूळ ग्रंथांच्या पृष्ठांचा आरंभ होत असतो व तो संपल्यानंतर खालील भाग आवश्यक असल्यास दिला जातो.

**१०.ग्रंथ मजकूर** :-येथे प्रत्यक्ष ग्रंथातील विषयाला सुरुवात केलेली असते.

**११.परिशिष्टे** :-ग्रंथलेखन करीत असताना सहाय्यकारी प्रलेखांचा या भागात समावेश केला जातो किंवा वाचकांना विशिष्ट प्रकारची माहिती देणे आवश्यक आहे. उदा प्रश्नावली, कोष्टके, आकडेवारी, पारिभाषिक शब्दावली, संदर्भ ग्रंथांची सूची इ. देण्यात येते.

**१२.निर्देश** :-ग्रंथात समाविष्ट करण्यात आलेले लहान मोठे विषय, घटना यांचा उल्लेख असणे हे चांगल्या ग्रंथाचे वैशिष्ट्य मानले जाते. म्हणून ग्रंथाच्या या भागात एखादा उल्लेख निश्चित ग्रंथात कुठे आहे हे समजण्यासाठी त्याचा पृष्ठ क्रमांक या ठिकाणी दिलेला असतो. ठळक घटना कोणकोणत्या प्रकरणात वारंवार आलेल्या आहेत याचा उल्लेख केलेला असतो. ह्या निर्देश किंवा सूचीची रचना आद्याक्षरानुसार एखाद्या भाषेच्या वर्णमालेनुसार केलेली असते.

**१३. दुरुस्तीपत्रक** :-ग्रंथांची अंतिम छपाई झाल्यानंतर पण बांधणीपूर्व जर काही चुका लेखकाच्या लक्षात आल्या तर त्या चुकांची दुरुस्ती ग्रंथाच्या या भागात करण्यात येते. हा भाग ग्रंथाच्या शेवटी किंवा प्रकरणे सुरु होण्यापूर्वी दिलेला आढळतो. यात चुकीने छापण्यात आलेला शब्द व बरोबर असलेला शब्द देण्यात येतो व त्याचा पृष्ठ क्रमांक देण्यात येतो. ग्रंथाचा हा भाग तालिकीकरणाच्या दृष्टीने तितकासा महत्वाचा नाही.

**१४. अभिप्राय पृष्ठ** :-संबधित ग्रंथाबद्दल वाचकांचे अभिप्राय सुचविण्यासाठी या पृष्ठाचा उपयोग होतो.

**१५. संदर्भ सूची (References)**:-संबधित ग्रंथासाठी अन्य ग्रंथातून काही संदर्भ घेतले असल्यास असल्यास त्या ग्रंथाचे विवरण पृष्ठ क्रमांकासाहित द्यावयाचे असतात.

**१६. ग्रंथसूची (Bibliography)**:-संबंधित ग्रंथ लिहिण्यासाठी जे ग्रंथ अभ्यासले असतील त्या सर्व ग्रंथाची यादी असते.

**निष्कर्ष**:-यावरून असे निदर्शनास येईल की, तालिकीकरणाच्या दृष्टीने अधिक जास्त माहिती ग्रंथनाम पृष्ठावर आढळते त्यामुळे ग्रंथाचा हा भाग अधिक महत्वाचा आहे. त्यासोबतच इतर भागही तितकेच महत्वाचे आहेत. जर तालिकाकाराला ग्रंथाचे अंतरंग माहित नसेल तर त्याला तालिकेमध्ये लागणारी माहिती प्राप्त करण्यास अडचण निर्माण होईल. म्हणून तालिकीकरणाच्या दृष्टीने ग्रंथाचे वरील विविध भाग महत्वाचे आहेत.

**ग्रंथसूची:**

१.भट, शरद गो. (२००८). *इलेक्ट्रानिक माहिती साधने* (प्रथम आवृत्ती). नागपूर: पिंपळापुरे बुक प्रकाशन.

२. राविकीर्ती, आल्लमप्रभू. (२००६). *शिक्षणातील माहिती तंत्रज्ञान* (द्वितीयावृत्ती). सातारा: सागर प्रकाशन.

३. पवार, एस.पी., बडकते, स., पवार, आर.जी., जाधव, सु. (२०१२). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र* (चौथी आवृत्ती). कोल्हापूर: फडके प्रकाशन.

४. काळे, किशोर. (२०१०). *माहिती सेवा व साधने* (प्रथम आवृत्ती). नागपूर: विश्व प्रकाशन.

५. नरगुंदे, रेवती. (२०१३). *ग्रंथालय आणि सामाजिक विकास* (प्रथम आवृत्ती). पुणे: युनिव्हर्सल प्रकाशन.

६. कोण्णूर, सुजाता., कोण्णूर, अनुप., कोण्णूर, मेखला. (२००९). *माहिती तंत्रज्ञान* (प्रथम आवृत्ती). पुणे: डायमंड पब्लिकेशन.

७. कोण्णूर, एम.बी.., कोण्णूर, सुजाता., माणगावकर, उष:प्रभा. (२००८). *ग्रंथालय व माहीतीशास्त्र कोश* (प्रथम आवृत्ती). पुणे: डायमंड पब्लिकेशन.